# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२५ जानेवारी,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २४/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, चिमुर, नागभिड, राजुरा, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१६** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **११** आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **७,१३,४००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**६) पोलीस स्टेशन बल्लारशाह :—**

दिनांक **२४/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सटट्ापटट्ीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशाह** येथे अप. क्र. **१०८/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,१८५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

---

: 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)

# प्रेस नोट

दिनांक २०/०१/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे वणी नाका येथे नाकाबंदी सुरू असतांना तेथे तैनातीस असलेल्या पोलीस शिपाई दिनेश मेश्राम व सुरज मेश्राम हे वाहनांची तपासणी करीत होते. दरम्यान १०:३० वाजता दोन टाटा योध्दा चारचाकी मालवाहु वाहने वणीकडुन भरधाव वेगाने येत असतांना दिसुन आले. त्यांना तैनात असलेल्या पोलीस कर्मचारी यांनी दुरूनच वाहन थांबविण्याचा इशारा दिला परंतु ते भरधाव वेगाने सरळ निघुन गेले. संशय बळावलयामुळे दोन्ही पोलीस कर्मचारी यांनी त्यांचा पाठलाग केला. व घडलेला प्रकाराबदद्लची माहिती पोलीस स्टेशन वरोरा येथील प्रभारी अधिकारी यांना सांगीतली. प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ सदरची माहिती खांबाळा येथे नेहमीप्रमाणे सुरू असलेल्या नाकाबंदीवरील पोलीस कर्मचारी यांना देवुन सर्तक आणि काळजीपुर्वक नाकाबंदी करण्याची सुचना दिली.

नागपुर मार्गावरील खांबाळा चेक पोस्ट येथे नाकाबंदी डयुटीकरीता पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश मेश्राम व कमलेश मोहमारे हे तैनात होते. काही वेळातच मिळालेल्या माहितीनुसार वरोरा ते नागपुर मार्गे दोन टाटा योध्दा चारचाकी मालवाहु वाहने भरधाव वेगाने येत असतांना दिसुन आले. सदरच्या वाहनांना प्रकाश मेश्राम यांनी बॅरीकेट्सच्या मागे राहुन बॅटरी व लाठीच्या साहायाने दुरूनच वाहन थांबविण्याचा इशारा दिला. परंतु त्या दोन्ही वाहनचालकांनी त्यांना न जुमानता आपले वाहन भरधाव वेगाने बॅरीकेट्स उडवित नाकाबंदीमध्ये तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगावर चढविले. यामध्ये पोलीस शिपाई प्रकाश मेश्राम यांना वाहनाची जोरदार धडक लागल्याने त्यांना जागीच विरमरण आले.

सदर घटनेतील दोन्ही वाहने व त्यातील २४ जनावरांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी १) इम्तीयाज अहमद फैयाज वय १९, २) मोहम्मद रजा अब्दुल जब्बार कुरेशी वय १९, यांना घटणास्थळावरूनच अटक करण्यात आले तर दुसऱ्या वाहनातील पसार झालेल्या दोन आरोपींच्या शोधाकरीता पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील दोन पोलीस पथक, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा यांचे एक पथक रवाना करण्यात आले होते. सदर पथकाद्वारे पसार झालेले १) मोहम्मद फहीम शेख अजीम शेख वय २३, २) आदिल खान उर्फ मोहमंद कादीर खान वय २१ या दोन्ही आरोपींना आज दिनांक २१/०१/२०१९ रोजी नागपुर परिसरातील कामठी येथुन अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन वरोरा येथे अप.क्र. ७२/२०१९ कलम ३०२, ३०७, ३५३, ३३२, ३३३, ३४ भादंवि सहकलम ११ महाराष्ट्र प्राणी सरक्षण अधिनियम कायदा, कलम १८४, ८३/१७७ मोटार वाहन कायदा व कलम ४७, ४८, ४९(अ), ५०(अ), ५४ पशु वाहतुक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील फरार आरोपी ५) अतुल पुरूषोत्तम गौरकार वय २५ रा. वणी, ६) पवन दिनकर उरकुंडे वय २२ रा. वणी यांना सुध्दा अटक करण्यात आली असुन सर्व ०१ ते ०६ आरोपी हे दिनांक २५/०१/२०१९ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे. सदर गुन्हयाचा तपास प्रो. आयपीएस अधिकारी श्री. नवनित कांवत यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

---

# गडचांदुर कोळसा चोरी प्रकरण
## १७ आरोपीसह ०७ ट्रक जप्त

दिनांक १९ जाने. २०१९ पोलीस स्टेशन गडचांदुर येथे फिर्यादी नामे जितेंद्रसिंग चरडे माईन्स मॅनेजर पैनगंगा परीयोजना कोयला खदान विरुर गाडेगाव यांनी रिपोर्ट दिली की, १९/०१/२०१९ चे रात्री दरम्यान काही अज्ञात इसम हे हायवा ट्रकसह कोळसा खदान मध्ये प्रवेश करून त्यातील दोन ट्रक मध्ये १,८९,०००/—रु. चा कोळसा भरुन चोरुन नेला. अशा रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गडचांदुर येथे अप.क्र. २६/२०१९ कलम ३७९, भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासादरम्यान गुन्हयाचे प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांना विचारपुस केली तर त्यांनी सांगीतले की, रात्रो दरम्यान कोळसा खदान येथे काम सुरू असतांना अचानक ट्रकमध्ये एकुण ६ इसमांनी खदानमध्ये प्रवेश करून व त्या इसमांनी कोळसा खदानमधील लोडर, सुरक्षा रक्षक यांना तलवार व चाकुचा धाक दाखवुन ट्रक मध्ये जबरीने कोळसा भरुन चोरुन नेला. साक्षदारांनी दिलेल्या माहितीवरून गुन्हयामध्ये कलम ३९५ भादंवि, सहकलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा याप्रमाणे कलम समाविष्ट करण्यात आले.

गुन्हयामध्ये मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून आरोपी क्रमांक १) युसुफ उर्फ बडगा इकबाल शेख २) अब्दुल शहादत कुरेशी ३) शाहरूख खान ४) जुनेद शेख फारूख शेख ५) राजु रामसरण केसकर ६) कौसर अली शेख सर्व रा. घुग्घुस असे आरोपी यापुर्वीच अटक करण्यात आले असुन न्यायालयाकडुन दिनांक २८/०१/२०१९ पर्यत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे. तपासादरम्यान आरोपी नामे ७) पत्रु मोतीराम कडवे वय ५७ रा. ताडाली, ८) सचिन मनोहर कन्नाके वय ३१, रा. मानोली, ९) अरूण मुरलीधर कणसे वय २४ रा. कैलासनगर, १०) राकेश तेजराम बोधणकर, वय २५ रा. कैलासनगर, ११) संजय पांडुरंग भुसारी, वय ३२ रा. राजुर, १२) प्रफुल आनंद उरकुडे, वय २१ रा. पाकडगाव, १३) प्रदिप गजानन कुत्तरमारे, वय २८ रा. निंबाळा वणी, १४) दिलीप नानाजी चांदेकर, वय ३२ रा. पाटाळा, १५) राकेश तुकाराम मस्की, वय ३२ रा. झरपट, १६) अनंता तुकाराम मस्की, वय २९ रा. झरपट, १७) भास्कर नथ्थुजी बेलेकर वय ४५ रा. पाटाळा, भद्रावती १८) रविंद्र शशिकांत माळी वय २४ रा. जळगाव ह.मु. कैलासनगर यांना अटक करण्यात आली असुन आरोपीतांना आज दिनांक २५/०१/२०१९ न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. आरोपीकडुन तपसादरम्यान एकुण ०७ ट्रक जप्तीची कार्यवाही सुरू आहे. यापैकी दोन ट्रकचे नंबर ट्रक क्र.एम एच २९ टी ४५८, एम एच २९ टी १५४२ असे असुन इतर ५ ट्रक विनानंबरचे आहे.

सदर गुन्हयाचे तपासात पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी व अपर पोलीस अधीक्षक श्री. हेमराजसिंह राजपूत यांनी स्वत: विशेष लक्ष देवुन यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी गडचांदुर श्री. विलास यामावार, ठाणेदार गडचांदुर श्री. पोनि. पवार, पोउपनि कडु, लिंगाडे, पोहवा मेश्राम, तुमराम, मुंडे, व स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. कोकाटे, सपोनि. बोरकुटे, सफौ दौलत, भोयर, पोहवा भुजाडे, पोशि प्राजंल, कुंदनसिंग बावरी यांनी महत्वाची कामगीरी बजावलि आहे.

---